# नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प २.०

(जागतिक बँक व महाराष्ट्र शासन यांचा संयुक्त प्रकल्प)

# डीबीटी पोर्टल माहिती पुस्तिका

## (वैयक्तिक लाभार्थी)

वनपट्टाधारक व जिवती तालुक्यातील लाभार्थी करिता

प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, मुंबई
कृषि विभाग

# अनुक्रमणिका


| वर्णन | पृष्ठ |
|---|---|
| १.० डीबीटी प्रणाली सारांश (DBT Portal Overview) ---------------------------------- | ०३ |
| २.० प्रकल्पांतर्गत डीबीटी पोर्टलवरील प्राप्त अर्जांवर प्रक्रिया करण्यासाठी टप्पानिहाय कार्यपद्धती ------------------------------------------ | ०४ |
| ३.० नोंदणी प्रक्रिया (Registration Process) | |
| ३.१ वनपट्टाधारक तसेच जिवती तालुक्यातील लाभार्थीकरिता नोंदणी प्रक्रिया------------ | ०४ |
| ४.० अर्ज प्रक्रिया (Application Process) | |
| ४.१ वनपट्टाधारक तसेच जिवती तालुक्यातील लाभार्थीकरिता अर्ज प्रक्रिया -------------- | १५ |
| ४.१.१ प्रोफाईल ----------------------------------------------------------- | १६ |
| ४.१.२ नवीन बाबीसाठी अर्ज प्रक्रिया ------------------------------------------ | २४ |
| ४.१.३ माझे अर्ज --------------------------------------------------------- | ३१ |
| ४.१.४ अनुदान मागणी------------------------------------------------------ | ३२ |

## १.० डीबीटी प्रणाली सारांश (DBT Portal Overview)

महाराष्ट्र शासनाने जागतिक बँकेच्या भागीदारीमध्ये हवामान अनुकूल शेती (Project on Climate Resilient Agriculture - PoCRA) प्रकल्प, ज्याला नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (NDKSP) म्हणूनही ओळखले जाते, टप्पा -२ हा राज्यातील २१ जिल्ह्यांमधून निवडलेल्या ७२०१ गावांसाठी तयार केला आहे. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प हा देशातील सर्वात महत्वाकांक्षी हवामान अनुकूल प्रकल्प असून प्रकल्पाची अंमलबजावणी ६ वर्ष कालावधीमध्ये करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. या प्रकल्पाचा विकास उद्देश संसाधन-वापर कार्यक्षमता (Resource-use efficiency) आणि डेटा-आधारित (Data-driven) निर्णय साधनांसह उत्सर्जन-स्पर्धात्मक उत्पादन प्रणालीला प्रोत्साहन देऊन महाराष्ट्रातील निवडक जिल्ह्यांतील अल्पभूधारक शेतकऱ्यांची लवचिकता आणि नफा सुधारणे हा आहे.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ चा मुख्य उद्देश म्हणजे "महाराष्ट्रातील निवडक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना हवामान बदलांमुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम करणे आणि शेतीतील नफ्यात वृद्धी करणे."

केंद्र व राज्य शासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणारे अनुदान वस्तूस्वरुपात न देता, सदर अनुदान लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण (DBT) पध्दतीने देण्यात येणार आहे. शासन निर्णयाच्या अनुषंगाने कृषि विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजनांतर्गत अनुदानावर वाटप करण्यात येणाऱ्या घटकांसंदर्भात थेट लाभ हस्तांतरण पोर्टल (DBT) राबविण्यास कृषि विभागाने मंजुरी दिलेली आहे. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पातील विविध योजनांचे लाभ शेतकऱ्यांना देताना ते थेट लाभ हस्तांतरण पोर्टलद्वारे (DBT) देण्याबाबत जागतिक बँकेने मंजुरी दिलेली आहे. सदरचे लाभ थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने (DBT) देण्याबाबतची कार्यपद्धती प्रकल्प व्यवस्थापन आराखडा (PIP) व वित्तीय व्यवस्थापन पुस्तिकेत देण्यात आलेली असून त्यास शासनाने मंजुरी प्रदान केलेली आहे.

प्रकल्प व्यवस्थापन कक्षामार्फत प्रकल्पातील विविध घटक, उपघटक व योजनांचा लाभ (योजनांची यादी सोबत जोडलेली आहे) थेट लाभ हस्तांतरण पोर्टल /प्रणाली (वेब प्लॅटफॉर्म व मोबाईल ॲप्लिकेशन ) मार्फत २१ जिल्ह्यातील निवडलेल्या लाभार्थ्यांना घ्यावयाचा आहे.

**डीबीटी यंत्रणा पारंपारिक पद्धतीच्या तुलनेत खालील फायदे प्रदान करते:**

- कागद विरहित प्रक्रिया
- अर्जदारासाठी सहजतेने वापर
- पारदर्शक आणि सुलभ शोधक यंत्रणा
- एकात्मिक पेमेंट गेटवेमुळे चुकीची अदायगी/ चुकीच्या लाभार्थ्यांना अदायगी अदा करण्यापासून रोखते
- जलद आणि सुलभ अनुदान वितरण

या पुस्तिकेमध्ये प्रकल्पासाठीच्या डीबीटी प्रणाली बाबतचे सविस्तर वर्णन देण्यात आलेले असून वनपट्टाधारक तसेच जिवती तालुक्यातील ज्या लाभार्थींना ॲग्रीस्टॅक प्रणालीवर जमिनीच्या तपशिलाची नोंदणी करण्यास तांत्रिक समस्या येत आहे अशा लाभार्थ्यांना क्षेत्रीय स्तरावरून लाभार्थी नोंदणी, अर्ज सादर करणे व अर्थसहाय्यासाठी अनुदान मागणी करणे या बाबतच्या सर्व प्रक्रियांची सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे.

## २.० प्रकल्पांतर्गत डीबीटी पोर्टलवरील प्राप्त अर्जांवर प्रक्रिया करण्यासाठी टप्पानिहाय कार्यपद्धती:


प्रकल्पांतर्गत डीबीटी प्रणालीवर नोंदणीकृत शेतकरी/ लाभार्थ्यांनी वैयक्तिक लाभाच्या घटकासाठी अर्ज केल्यानंतर पुढील टप्पानिहाय कार्यवाही केली जाईल;

- लाभार्थी अर्ज पडताळणी (डेस्क-१) : समूह सहाय्यक
- ग्राम कृषि विकास समिती (GKVS) मंजुरी (डेस्क-१): समूह सहाय्यक
- पूर्व स्थळ पाहणी (डेस्क-२) : सहाय्यक कृषि अधिकारी
- पूर्वसंमती प्रदान (डेस्क-३): तालुका कृषि अधिकारी/उपविभागीय कृषि अधिकारी
- शेतकरी/लाभार्थी मार्फत घटकाची अंमलबजावणी व अनुदान मागणी : देयके व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता
- मोका तपासणी (डेस्क-४): सहाय्यक कृषि अधिकारी/ उप कृषि अधिकारी/ मंडळ कृषि अधिकारी/ तालुका कृषि अधिकारी/उपविभागीय कृषि अधिकारी
- लेखाविषयक वित्तीय तपासणी (डेस्क-५): लेखाधिकारी (उपविभाग स्तर)
- अनुदान वितरणासाठी मान्यता (डेस्क-६) : उपविभागीय कृषि अधिकारी/ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
- अनुदान अदायगी शिफारस (मेकर- प्रकल्प व्यवस्थापन कक्ष येथील लेखाधिकारी)
- अनुदान अदायगीस अंतिम मान्यता (चेकर-वित्त विशेषज्ञ, प्रकल्प व्यवस्थापन कक्ष)


## ३.० नोंदणी प्रक्रिया (Registration Process)

### ३.१ वनपट्टाधारक तसेच जिवती तालुक्यातील लाभार्थीकरिता नोंदणी प्रक्रिया

डीबीटी प्रणालीवर नोंदणी प्रक्रिया ही प्रकल्पांतर्गत निवडक गावांमधील वनक्षेत्रात समाविष्ट वनपट्टाधारक लाभार्थी व विशेषत: जिवती तालुक्यातील ज्या लाभार्थींना ॲग्रीस्टॅक प्रणालीवर जमिनीच्या तपशिलाची नोंदणी करण्यास तांत्रिक समस्या येत आहे अशा लाभार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर लाभार्थ्यांनी नोंदणीसाठी https://dbt-ndksp.mahapocra.gov.in/ या वेबसाईटचा अथवा महाविस्तार ए. आय. ॲप्लिकेशनचा वापर करावा. प्रकल्पाच्या वेबसाईटवर गेल्यावर खालील प्रमाणे होम पेज दिसेल:





*वर्णन (Description):-* प्रकल्पाच्या संकेतस्थळावर प्रवेश केल्यानंतर सुरुवातीच्या पृष्ठावर लाभार्थी नोंदणी करण्यासाठी वरीलप्रमाणे प्राथमिक स्क्रीन दिसेल. डाव्या बाजूवरील **“शेतकरी”** या ठळक शीर्षकाशेजारील हिरव्या रंगाच्या चिन्हावर क्लिक करावे. त्यानंतर खालीलप्रमाणे पृष्ठ उघडेल.




वरील प्रमाणे उजव्या बाजूला दिलेल्या चौकटीमध्ये वनपट्टाधारक तसेच जिवती तालुक्यातील लाभार्थींना नोंदणी करण्यासाठी **“नोंदणी करा”** या टॅब वर क्लिक करावे. त्यानंतर प्रथम नोंदणीपूर्वी माहिती दर्शविणारी पॉपअप स्क्रीन दिसेल.

**प्रकल्प क्षेत्रातील वनपट्टाधारक व जिवती तालुक्यातील लाभार्थी यांच्यासाठी सर्वप्रथम आपल्या आधार क्रमांकाचा वापर करून नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यानंतरच ते लॉगिन करून प्रकल्प घटकाचा लाभ घेऊ शकतात.**





वरील प्रमाणे आवश्यक कागदपत्रांची यादी व नोंदणीसाठी अनिवार्य गोष्टी तयार ठेवाव्यात. जसे कि, सक्रीय मोबाईल क्रमांक, आधार क्रमांक (मोबाईल क्रमांक आधारशी संलग्न असावे), आवश्यक असल्यास- जात प्रमाणपत्र/ अपंगत्व प्रमाणपत्र/ महिलांकरिता घटस्फोटीत अथवा विधवा प्रमाणपत्र तसेच वनपट्टा प्रमाणपत्र/७/१२ व ८-अ इत्यादींच्या स्कॅन प्रती सोबत असाव्यात. त्यांनतर **"पुढे जा"** या बटणावर क्लिक केल्यावर नोंदणीचे खालील प्रमाणे पहिले मुखपृष्ठ दिसेल. यामध्ये मोबाईल क्रमांक पडताळणी, आधार क्रमांक पडताळणी, इतर माहिती व स्वयंघोषणा अशा चार टप्प्यामध्ये नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे.


**टप्पा-१: मोबाईल क्रमांक पडताळणी**




वनपट्टा धारक / जिवती तालुका शेतकरी
मोबाईल पडताळणी
आधार पडताळणी
इतर माहिती
घोषणापत्र सादर करा
मोबाईल क्रमांक भरा *
खालील उदाहरण सोडवा *
पुनःप्राप्त करा
2 + 5=
7
ओटीपी मिळवा
सर्व * चिन्हांकित फील्ड आवश्यक आहेत.


वनपट्टा धारक / जिवती तालुका शेतकरी
मोबाईल पडताळणी
घोषणापत्र सादर करा
संदेश
सत्यापनासाठी ओटीपी तुमच्या मोबाइल क्रमांकावर पाठवण्यात आला आहे.
बंद करा
ओटीपी प्रविष्ट करा *
उर्वरित वेळ: 00:54s
सत्यापित करा
सर्व * चिन्हांकित फील्ड आवश्यक आहेत.




वरीलप्रमाणे प्रथम आपला सक्रीय मोबाईल क्रमांक प्रविष्ट करा. त्यानंतर खाली एक अंकगणिताचे उदाहरण दिलेले आहे त्याचे अचूक उत्तर (कॅप्चा) समोर दिलेल्या रकान्यात प्रविष्ट करा. पुढे **"ओटीपी मिळवा"** या बटणवर क्लिक करा. त्यानंतर प्रविष्ट केलेल्या मोबाईल क्रमांकावर सहा अंकी ओटीपी प्राप्त होईल. जर निर्धारित वेळेत ओटीपी प्राप्त होण्यास विलंब झाल्यास पुनश्च ओटीपी मिळवण्यासाठी क्लिक करू शकता. पुढे प्राप्त ओटीपी दिलेल्या रकान्यात अचूक प्रविष्ट करून **"सत्यापित करा"** या बटणावर क्लिक करा. त्यानंतर लाभार्थीचा मोबाईल क्रमांक यशस्वीरित्या सत्यापित झाल्याचा संदेश स्क्रीनवर दिसेल.


टप्पा-२: आधार क्रमांक पडताळणी


















दुसऱ्या टप्प्यामध्ये वरीलप्रमाणे प्रथम आपला आधार क्रमांक प्रविष्ट करा. त्यानंतर प्रामाणिकरणासाठी **"ओटीपी"** हा पर्याय निवडा. त्यानंतर लाभार्थीच्या आधार संलग्न मोबाईल क्रमांकावर ओटीपी प्राप्त होईल. जर निर्धारित वेळेत ओटीपी प्राप्त होण्यास विलंब झाल्यास पुनश्च ओटीपी मिळवण्यासाठी क्लिक करू शकता. पुढे प्राप्त दिलेल्या रकान्यात अचूक प्रविष्ट करून **"ओटीपी पडताळा"** या बटणवर क्लिक करा. त्यांनतर लाभार्थीचा आधार क्रमांक यशस्वीरित्या पडताळला गेल्याचा संदेश स्क्रीनवर दिसेल. तसेच लाभार्थीचा आधार तपशील फोटोसह दर्शविला जाईल. त्यानंतर **"पुढे जा"** या बटणवर क्लिक करा.


### टप्पा-३: इतर माहिती




वनपट्टा धारक / जिवती तालुका शेतकरी
मोबाईल पडताळणी
आधार पडताळणी
इतर माहिती
घोषणापत्र सादर करा
जात प्रमाणपत्र
फाईल यशस्वीरित्या अपलोड झाली आहे
बंद करा
पत्ता *
जिल्हा *
चंद्रपूर
गाव *
पिनकोड *
442903
जात प्रवर्ग
अनुसूचित जाती
कृपया जात प्रमाणपत्र अपलोड करा
Choose file
अपलोड करा
दस्तऐवज पाहा
(pdf/jpg) कमाल 5mb


अपंगत्वाची माहिती
कोणत्याही प्रकारचे अपंगत्व? *
आहे
अपंगत्व प्रमाणपत्र *
Choose file No file chosen
अपलोड करा
(pdf/jpg) कमाल 5mb
कृपया अपंगत्व प्रमाणपत्र अपलोड करा
मागे जा
पुढे जा
सर्व * चिन्हांकित फील्ड आवश्यक आहेत.


अपंगत्वाची माहिती
कोणत्याही प्रकारचे अपंगत्व? *
आहे
अपंगत्व प्रमाणपत्र *
Choose file
अपलोड करा
(pdf/jpg) कमाल 5mb
मागे जा
पुढे जा
सर्व * चिन्हांकित फील्ड आवश्यक आहेत.









तिसऱ्या टप्प्यामध्ये वरीलप्रमाणे प्रथम आधारनुसार पत्ता दर्शविला जाईल. यामध्ये आपला रहिवाशी पत्ता अंतर्भूत करावयाचा आहे. यामध्ये राज्य, जिल्हा, तालुका आणि गाव दिलेल्या यादीतून निवडून खाली दिलेल्या रकान्यात पिनकोड प्रविष्ट करा. पुढे जात प्रवर्ग दिलेला आहे त्यातील पर्याय निवडा, जर लाभार्थी अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती मधील असल्यास, जात प्रमाणपत्र अपलोड करण्यास स्क्रीन उपलब्ध होईल. त्यामध्ये जास्तीत जास्त ५ एम.बी. आकाराची जात प्रमाणपत्राची PDF **फाईल निवडा** व **अपलोड** या बटणावर क्लिक करा.

महिलांकरिता विशेष संवर्ग दिलेला आहे. तो लागू असल्यास, घटस्फोटीत अथवा विधवा हा पर्याय निवडा. त्यानंतर संबधित प्रमाणपत्र अपलोड करण्यास स्क्रीन उपलब्ध होईल. त्यामध्ये जास्तीत जास्त ५ एम.बी. आकाराची प्रमाणपत्राची PDF **फाईल निवडा** व **अपलोड** या बटणावर क्लिक करा.

पुढे अपंगत्वाची माहिती नमूद करावयाची आहे. लाभार्थीस अपंगत्व असल्यास, अपंगत्व प्रमाणपत्र अपलोड करण्यास स्क्रीन उपलब्ध होईल. त्यामध्ये जास्तीत जास्त ५ एम.बी. आकाराची अपंगत्व प्रमाणपत्राची PDF **फाईल निवडा** व **अपलोड** या बटणावर क्लिक करा. शेवटी **"पुढे जा"** या बटणावर क्लिक करा.


टप्पा-४: स्वयंघोषणा






चौथ्या टप्प्यामध्ये वरीलप्रमाणे प्रथम स्वयंघोषणा पत्रातील प्रकल्पाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार मजकूर दर्शविला जाईल. त्याचे वाचन करून समजावून घेणे. प्रकल्पाच्या अटी व शर्तीशी सहमत असल्यास शेवटी

दिलेल्या रिक्त रकाणा निवडावा. त्यांनतर **“पुनरावलोकन”** या बटणावर क्लिक करावे. त्यानंतर खालीलप्रमाणे स्क्रीन दिसेल.




यामध्ये आपण नोंदणी करताना अंतर्भूत केलेली माहिती संक्षिप्त स्वरुपात दर्शविली जाईल. त्याची खात्री करून **“नोंदणी करा”** या बटणावर क्लिक करा. त्यानंतर लाभार्थीचा प्रकल्पांतर्गत डॅशबोर्ड खुला होईल.



## ४.० अर्ज प्रक्रिया (Application Process)

प्रकल्पांतर्गत नोंदणीकृत शेतकरी/ लाभार्थ्यांनी प्रकल्पाच्या डीबीटी प्रणालीवर वैयक्तिक लाभाच्या घटकांकरिता अर्ज प्रक्रिया करण्यासाठी https://dbt-ndksp.mahapocra.gov.in/ या वेबसाईटचा अथवा महाविस्तार ए. आय. ॲप्लिकेशनचा वापर करावा.

### ४.१ वनपट्टाधारक तसेच जिवती तालुक्यातील लाभार्थीकरिता अर्ज प्रक्रिया


प्रकल्पांतर्गत शेतकरी लाभार्थीनी आधार क्रमांक वापरून लॉगिन करणे अनिवार्य आहे. प्रकल्पाच्या वेबसाईटवर गेल्यावर होम पेज वर खालील प्रमाणे स्क्रीन दिसेल:











वरील प्रमाणे शेतकरी लाभार्थ्यांनी **"लॉगिन करा"** या पृष्ठावरील शेतकरी या टॅब अंतर्गत प्रथम प्रामाणिकृत प्रकारातून **"आधार"** हा पर्याय निवडा. त्यानंतर दिलेल्या रिक्त रकाण्यात १२ अंकी आधार क्रमांक प्रविष्ट करा. त्यानंतर खाली एक अंकगणिताचे उदाहरण दिलेले आहे त्याचे अचूक उत्तर (कॅप्चा) समोर दिलेल्या रकान्यात प्रविष्ट करून **"सत्यापित करा"** या बटणावर क्लिक करा. त्यानंतर आधार संलग्न मोबाईल क्रमांकावर सहा अंकी ओटीपी प्राप्त होईल. जर निर्धारित वेळेत ओटीपी प्राप्त होण्यास विलंब झाल्यास पुनश्च ओटीपी मिळवण्यासाठी क्लिक करू शकता. त्यापुढे प्राप्त ओटीपी दिलेल्या रकाण्यात अचूक प्रविष्ट करून **"लॉगिन करा"** या बटणावर क्लिक करा. आधारसह ओटीपी पडताळणी पूर्ण झालेनंतर खालील प्रमाणे शेतकरी डॅशबोर्ड स्क्रीन उपलब्ध होईल.





## ४.१.१ शेतकरी प्रोफाईल

वैयक्तिक लाभाच्या डीबीटी पोर्टलवर लॉगिन केल्यानंतर प्रथम शेतकरी लाभार्थीने **"प्रोफाईल"** अपडेट करणे अनिवार्य आहे. त्याकरिता डॅशबोर्ड स्क्रीनच्या डाव्या बाजूला मुख्य मेन्यू मध्ये **"प्रोफाईल"** टॅब निवडा. यामध्ये वैयक्तिक माहिती, पत्ता व शेतजमिनीची माहिती अद्ययावत करणे आवश्यक आहे. सदर बाबतचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे दिलेला आहे.

### टप्पा-१: वैयक्तिक माहिती







प्रोफाईल अद्ययावत करताना प्रथम वैयक्तिक माहितीची खात्री करा. त्यानंतर नवीन मोबाईल अद्ययावत करण्याची ओटीपी आधारित कार्यप्रणाली दिलेली आहे. पुढे अपंगत्वाची माहिती नमूद करावयाची आहे. शेतकरी लाभार्थीस अपंगत्व असल्यास, अपंगत्व प्रमाणपत्र अपलोड करण्यास स्क्रीन उपलब्ध होईल. त्यामध्ये जास्तीत जास्त ५ एम.बी. आकाराची अपंगत्व प्रमाणपत्राची PDF **फाईल निवडा** व **अपलोड** या बटणावर क्लिक करा.

पुढे जात प्रवर्ग दिलेला आहे त्यातील पर्याय निवडा, जर लाभार्थी अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती मधील असल्यास, जात प्रमाणपत्र अपलोड करण्यास स्क्रीन उपलब्ध होईल. त्यामध्ये जास्तीत जास्त ५ एम.बी. आकाराची जात प्रमाणपत्राची PDF **फाईल निवडा** व **अपलोड** या बटणावर क्लिक करा.


महिलांकरिता विशेष संवर्ग दिलेला आहे. तो लागू असल्यास, घटस्फोटीत अथवा विधवा हा पर्याय निवडा. त्यानंतर संबधित प्रमाणपत्र अपलोड करण्यास स्क्रीन उपलब्ध होईल. त्यामध्ये जास्तीत जास्त ५ एम.बी. आकाराची प्रमाणपत्राची PDF **फाईल निवडा** व **अपलोड** या बटनवर क्लिक करा. त्यानंतर शेवटी **"पुढे जा"** या बटणावर क्लिक करा.


**टप्पा-२: पत्ता माहिती**





वरीलप्रमाणे पुढील पृष्ठावर प्रवेश केल्यानंतर लाभार्थीने आधार क्रमांकाशी संलग्न दर्शविलेला पत्ता बरोबर असल्याची खात्री करावी.


## टप्पा-३: शेतजमिनीची माहिती
























शेत जमिनीच्या माहितीमध्ये शेतकरी लाभार्थीच्या **"जमिनीचा तपशील जोडा"** या टॅब वर क्लिक करावे. त्यामध्ये प्रकल्प गावातील जमिनीच्या तपशिलाची नोंद करावयाची आहे. जसे कि, जिल्हा, तालुका, गाव, खात्याचा प्रकार, सर्व्हे नंबर व एकूण क्षेत्र (हे.आर.) प्रविष्ठ करून **"जमीन जतन करा"** या टॅब वर क्लिक करावे. त्यानंतर लाभार्थीला आजून जमिनीचा तपशील जोडावयाचा आहे का? हा पॉप अप स्क्रीन उपलब्ध होईल. **"होय"** या पर्यायावर क्लिक करून एका पेक्षा अधिक जमिनीचा तपशील जोडू शकता.


प्रकल्प गावातील जमिनीचा तपशील
अ. क्र.
शेत क्रमांक
सर्वे नंबर
जिल्हा
तालुका
गाव
खाते प्रकार
मालकाचे नाव
एकूण जमीन (हेक्टर)
पाणी स्त्रोत
ऊर्जा स्त्रोत
1 - ४८ चंद्रपूर जिवती आंबेझरी (५४१७२१) सामायिक खातेदार - १.२० उपसा सिंचन कुपनलिका वीज कनेक्शन सौर उर्जा चलित पंप
कागदपत्र अपलोड
PDF • Max 5MB
वनपट्टा प्रमाणपत्र / ७/१२ व ८-अ उतारा
फाइल निवडा
फाइल निवडलेली नाही
अपलोड करा
2 - २६ चंद्रपूर जिवती आंबेझरी (५४१७२१) व्यक्तिगत खातेदार - २.४० कुपनलिका डिझेल इंजिन पंप
कागदपत्र अपलोड
PDF • Max 5MB
वनपट्टा प्रमाणपत्र / ७/१२ व ८-अ उतारा
फाइल निवडा
फाइल निवडलेली नाही
अपलोड करा


प्रकल्प गावातील जमिनीचा तपशील
अ. क्र.
शेत क्रमांक
सर्वे नंबर
जिल्हा
तालुका
गाव
खाते प्रकार
मालकाचे नाव
एकूण जमीन (हेक्टर)
पाणी स्त्रोत
ऊर्जा स्त्रोत
1 - ४८ चंद्रपूर जिवती आंबेझरी (५४१७२१) सामायिक खातेदार - १.२० उपसा सिंचन कुपनलिका वीज कनेक्शन सौर उर्जा चलित पंप
कागदपत्र अपलोड
PDF • Max 5MB
वनपट्टा प्रमाणपत्र / ७/१२ व ८-अ उतारा
फाइल निवडा
अपलोड करा



प्रकल्प गावातील जमिनीचा तपशील
अ. क्र.
शेत क्रमांक
सर्वे नंबर
जिल्हा
तालुका
गाव
खाते प्रकार
मालकाचे नाव
एकूण जमीन (हेक्टर)
पाणी स्त्रोत
ऊर्जा स्त्रोत
1 - ४८ चंद्रपूर जिवती आंबेझरी (५४१७२१) सामायिक खातेदार - १.२० उपसा सिंचन कुपनलिका वीज कनेक्शन सौर उर्जा चलित पंप
कागदपत्र अपलोड
PDF • Max 5MB
वनपट्टा प्रमाणपत्र / ७/१२ व ८-अ उतारा
View
Re-upload


प्रकल्प गावातील जमिनीचा तपशील
अ. क्र.
शेत क्रमांक
सर्वे नंबर
जिल्हा
तालुका
गाव
खाते प्रकार
मालकाचे नाव
एकूण जमीन (हेक्टर)
पाणी स्त्रोत
ऊर्जा स्त्रोत
1 - ४८ चंद्रपूर जिवती आंबेझरी (५४१७२१) सामायिक खातेदार - १.२० उपसा सिंचन कुपनलिका वीज कनेक्शन सौर उर्जा चलित पंप
कागदपत्र अपलोड
PDF • Max 5MB
वनपट्टा प्रमाणपत्र / ७/१२ व ८-अ उतारा
View
Re-upload
2 - २६ चंद्रपूर जिवती आंबेझरी (५४१७२१) व्यक्तिगत खातेदार - २.४० कुपनलिका डिझेल इंजिन पंप
कागदपत्र अपलोड
PDF • Max 5MB
वनपट्टा प्रमाणपत्र / ७/१२ व ८-अ उतारा
View
Re-upload

शेत जमिनीच्या माहितीमध्ये शेतकरी लाभार्थीने जमिनीचा तपशील जोडल्यानंतर संबधित जमिनीचे सर्व्हे नंबर निहाय अचूक-सुस्पष्ट कागदपत्र जसे कि, **वनपट्टा प्रमाणपत्र/ चालू आर्थिक वर्षातील ७/१२ व ८-अ विषयक कागदपत्रे एकत्रित PDF स्वरुपात अपलोड करावीत.** अपलोड केलेले कागदपत्र **"View"** या बटणावर क्लिक करून पाहू शकता अथवा **"Re-upload"** करू शकता.




**महत्वाचे:** लाभार्थीला आजून जमिनीचा तपशील जोडावयाचा आहे का? या पॉप अप मेसेज मध्ये **"नाही"** हा पर्याय निवडल्यास वरील प्रमाणे स्क्रीन उपलब्ध होईल. त्यामध्ये प्रकल्प क्षेत्रातील आपल्या सर्व शेतजमिनीचा तपशील जोडण्यात आला आहे काय? असा प्रश्न दिलेला आहे. जर **"होय, निश्चित करा"** हा पर्याय निवडल्यास, लाभार्थी शेतकऱ्यास पुढे नवीन शेतजमिनीचा तपशील जोडता येणार नाही, याची लाभार्थीने सर्वस्वी नोंद घ्यायची आहे.



प्रकल्प गावातील जमिनीचा तपशील

| अ. क्र. | शेत क्रमांक | सर्वे नंबर | जिल्हा | तालुका | गाव | खाते प्रकार | मालकाचे नाव | एकूण जमीन (हेक्टर) | पाणी स्रोत | ऊर्जा स्रोत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | - | ४८ | चंद्रपूर | जिवती | आंबेझरी (५४१७२१) | सामायिक खातेदार | - | १.२० | उपलब्ध नाही संपादित करा | उपलब्ध नाही संपादित करा |
| 2 | - | २६ | चंद्रपूर | जिवती | आंबेझरी (५४१७२१) | व्यक्तिगत खातेदार | - | २.४० | उपलब्ध नाही संपादित करा | उपलब्ध नाही संपादित करा |



**खाता तपशील**
शेत क्रमांक : 48
सर्वे नंबर : 48
एकूण जमीन (हेक्टर) : 1.20 HA
खाते प्रकार: सामायिक खातेदार
मालकाचे नाव: -


**स्थान**
जिल्हा : चंद्रपूर
तालुका : जिवती
गाव : आंबेझरी


**साधनसंपत्ती**
पाणी स्त्रोत :
ऊर्जा स्त्रोत :

पाणी स्रोत उपलब्ध आहे का?
होय नाही


ऊर्जा स्रोत उपलब्ध आहे का?
होय नाही

BACK SAVE



पाणी स्रोत उपलब्ध आहे का?
होय
नाही
पाणी स्रोत निवडा
पाणी स्रोत निवडा
उपसा सिंचन
कुपनलिका
कालवा
विहीर
शेततळे
BACK
SAVE


पाणी स्रोत उपलब्ध आहे का?
होय
नाही
पाणी स्रोत निवडा
पाणी स्रोत निवडा
उपसा सिंचन, कुपनलिका


ऊर्जा स्रोत उपलब्ध आहे का?
होय
नाही
ऊर्जा स्रोत निवडा
ऊर्जा स्रोत निवडा
No sources selected
BACK
SAVE


ऊर्जा स्रोत निवडा
ऊर्जा स्रोत निवडा
वीज कनेक्शन
सौर उर्जा चलित पंप
डिझेल इंजिन पंप



ऊर्जा स्रोत उपलब्ध आहे का?
होय
नाही
ऊर्जा स्रोत निवडा
ऊर्जा स्रोत निवडा
वीज कनेक्शन
BACK
SAVE





वरीलप्रमाणे अर्ज करण्यापूर्वी लाभार्थी शेतकऱ्याने पाणी स्रोत आणि उर्जा स्रोत हे **"संपादित करा"** या लिंक वर क्लिक करून अंतर्भूत करणे आवश्यक आहे. **त्यानंतरच लाभार्थी शेतकरी वैयक्तिक लाभाच्या विविध घटकासाठी अर्ज करू शकतात.**


### ४.१.२ नवीन बाबीसाठी अर्ज प्रक्रिया


शेतकरी लाभार्थीने **"प्रोफाईल"** अपडेट केल्यानंतर डॅशबोर्ड स्क्रीनच्या डाव्या बाजूला मुख्य मेन्यू मध्ये **"नवीन बाबीसाठी अर्ज करा"** हि टॅब निवडा. यामध्ये प्रवेश केल्यानंतर खालील प्रमाणे अर्ज प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे.





# टप्पा-१: घटकाचे नाव निवडा







वैयक्तिक लाभाच्या घटकाची निवड करताना सर्वप्रथम दर्शविलेल्या यादी (Drop Down) मधून **"घटकाचा गट"** निवडा. त्यानंतर पुढे प्रस्तावित **"घटकाचे नाव"** निवडा. पुढे घटकाशी संबंधित **"प्रकार/पिक/हंगाम"** असल्यास दिलेल्या यादी (Drop Down) मधून आवश्यक पर्यायाची निवड करावी. तसेच संबंधित घटकास एकक लागू असल्यास **"एकक"** (उदा. अंतर, आकारमान, आकार इ.) निवडा. शेतकरी लाभार्थीने निवडलेल्या बाबींचा एकत्रित तपशील उजव्या बाजूला **"घटकाचा तपशील"** नमूद करण्यात आलेला आहे. त्याची खात्री करून उजव्या बाजूला शेवटी **"पुढे जा"** या बटणावर क्लिक करा.

**टप्पा-२: निवडलेल्या घटकाकरिता पात्रता निकष व आवश्यक कागदपत्रे**

लाभार्थी शेतकऱ्याने घटक निवड केल्यानंतर पुढील पृष्ठावर प्रकल्पांतर्गत घटकाच्या मार्गदर्शक सूचनानुसार लाभार्थी पात्रता निकष व अर्जासोबत डीबीटी पोर्टलवर अपलोड करावयाची आवश्यक कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे दर्शविल्यानुसार स्क्रीन वर उपलब्ध होईल. निवडलेल्या घटकामध्ये काही बदल करावयाचा असल्यास **"मागे जा"** या बटणाचा वापर करावा. सदरील पृष्ठावर दिलेल्या माहितीची खातरजमा केल्यानंतर स्क्रीनच्या उजव्या बाजूला शेवटी **"पुढे जा"** या बटणावर क्लिक करावे.






## टप्पा-३: जमीन निवडा




वरील प्रमाणे दर्शाविल्यानुसार, शेतकरी लाभार्थ्यास प्रकल्प गावातील जमीन तसेच एकूण एकंदर जमीन (हे. आर.) याचा तपशील माहितीस्तव दाखविला आहे. ज्या प्रकल्प गावामधील जमिनीवर घटकाची अंमलबजावणी करून लाभ घ्यावयाचा आहे ते **"गाव"** सर्वप्रथम निवडावे. त्यापुढे सदरील गावातील ज्या सर्वे नंबरवर लाभ घ्यायचा आहे तो **सर्वे नंबर** दिलेल्या यादी (Drop down) मधून निवडावा.


निवडलेल्या सर्वे नंबर चा तपशील स्क्रीन वर उपलब्ध होईल. यामध्ये सर्वे नंबर, खात्याचा प्रकार, एकूण क्षेत्र (हे. आर.) मध्ये दिसेल. तसेच शासनाच्या इतर योजनेमधून अथवा प्रस्तुत प्रकल्पातून यापूर्वी क्षेत्र आधारित इतर घटकाचे अथवा त्याच घटकासाठी लाभ घेतलेला असेल ते क्षेत्र **"लाभ घेतलेले क्षेत्र (हे. आर.)"** मध्ये दिसेल. तसेच त्याच सर्वे नंबरवर अर्ज करतेवेळी **"प्रक्रियेत असलेले क्षेत्र (हे. आर.)"** दर्शविण्यात आलेले आहे. त्यानंतर पुढे प्रस्तावित करीत असलेल्या **"घटकासाठी पात्र क्षेत्र (हे. आर.)"** प्रणालीद्वारे दर्शविलेले आहे. त्यानंतर पुढे दिलेल्या रकाण्यात **प्रस्तावित घटकासाठी करावयाचे क्षेत्र (हे. आर.) प्रविष्ट** करा.



ठिबक सिंचन साठी मागणी करावयाचे क्षेत्र *
हे. (हेक्टर)
आर (गुंठा)
0
00
डॅशबोर्ड
प्रोफाईल
नवीन बाबींसाठी अर्ज करा
माझे अर्ज
अनुदान मागणी
अनुदान वितरण पद्धत
स्वनिधी
आपण स्वतःच्या पैशातून खरेदी करता आणि नंतर अनुदान मिळते.
पी-सीबीडीसी (डिजिटल रुपया)
अनुदानाची रक्कम रोख किंवा बँक हस्तांतरणाऐवजी आरबीआयच्या डिजिटल रुपयाद्वारे (सेंट्रल बँक डिजिटल करन्सी) दिली जाईल.
पी-सीबीडीसी प्रणालीचा वापर करण्यासाठी PNB CBDC (डिजिटल रुपये) या मोबाईल ॲपचा वापर करून नोंदणी करणे आवश्यक आहे. सदरील ॲपबद्दल अधिक माहिती जाणून घेण्यासाठी खाली क्लिक करा.
अधिक माहिती साठी पहा →
पुढे जा →
← मागे जा
सर्व * चिन्हांकित फील्ड आवश्यक आहेत.


हे. (हेक्टर)
आर (गुंठा)
0
30
अनुदान पद्धत
Change Method
Payment Mode : स्वखर्चाने खरेदी
लाभार्थी स्वतःच्या निधीतून खरेदी करेल. तपासणी व मंजुरीनंतर अनुदानाची रक्कम अदा करण्यात येईल.
जमीन संमती पत्र *
फक्त PDF, कमाल ५ MB
PDF अपलोड करा
नमुना स्वरूप डाउनलोड करा
नोंदणीकृत वितरकाचे कोटेशन *
Upload PDF
PDF only, up to 5 MB
← मागे जा
पुढे जा →
सर्व * चिन्हांकित फील्ड आवश्यक आहेत.


Success
Land Consent uploaded.
बंद करा


जमीन संमती पत्र *
फक्त PDF, कमाल ५ MB
PDF अपलोड करा
नमुना स्वरूप डाउनलोड करा








अर्जदार सामाईक खातेदार असल्यास, इतर खातेदारांच्या **संमतीपत्राची PDF फाईल अपलोड** करावी. त्याबाबतचा नमुना सोबत दिलेला आहे तो डाउनलोड करावा. मार्गदर्शक सूचनेतील निकषानुसार एखाद्या घटकासाठी इतर कागदपत्रे आवश्यक असल्यास, त्या कागदपत्राची PDF फाईल अपलोड करावी. त्यानंतर स्क्रीनच्या उजव्या बाजूला शेवटी **“पुढे जा”** या बटणावर क्लिक करा.




वरील प्रमाणे पुढे शेतकरी लाभार्थ्यास प्रविष्ट केलेल्या माहितीची पडताळणी करण्याकरिता पॉप अप स्क्रीन उपलब्ध होईल. सदर माहितीमध्ये दुरुस्ती अथवा बदल करावयाचा असल्यास **“संपादन करा”** या बटणाचा वापर करावा. माहितीची पडताळणी केल्यानंतर पॉप अप स्क्रीन च्या उजव्या बाजूला शेवटी **“अर्ज करण्यासाठी पुढे जा”** या बटणावर क्लिक करा.

## टप्पा-४: हमीपत्र



**हमीपत्र**

ठिबक सिंचन संच


नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मी "**ठिबक सिंचन संच**" या घटकाकरिता ऑनलाईन अर्ज करीत आहे. त्यासाठीच्या निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांनूसार विहित अटी व शर्ती मला मान्य असून त्यासाठीचे हमीपत्र सादर करीत आहे.

**मी [illegible] सत्यप्रतिज्ञेवर प्रमाणीत करतो/ करते की,**

1. मी पूर्वसंमती मिळाल्यानंतर ठिबक सिंचन संच उभारणी करून खालीलप्रमाणे कागदपत्रे ऑनलाइन सादर करेन.
   अ) कंपनी प्रतिनिधी यांनी तयार केलेला सूक्ष्म सिंचन आराखडा
   ब) बिलाची प्रत (देयक)
   क) कार्य पूर्णत्वाचा दाखला
2. सदर ठिबक सिंचनाच्या साठी आवश्यक असलेली सिंचनाची सोयः विहीर/ कॅनॉल /शेततळे/सामुदायिक सिंचन सुविधा माझ्याकडे उपलब्ध आहे.
3. ठिबक सिंचन संचासाठी आवश्यक असलेली उर्जा साधने (विदयुत पंप/ डिझेल / सोलर) माझ्याकडे उपलब्ध असुन अधिकृत विदयुत जोडणीची सुविधा माझ्याकडे उपलब्ध आहे.
4. ज्या क्षेत्रासाठी ठिबक अनुदानासाठी अर्ज केलेला आहे त्या क्षेत्रावर यापूर्वीच्या ७ वर्षामध्ये मी शासनाच्या कोणत्याही योजनेतुन ठिबक संचाच्या अनुदानाचा लाभ घेतलेला नाही.
5. ज्या क्षेत्रासाठी ठिबक सिंचन संचाच्या अनुदानाची मागणी केलेली आहे त्यासह मी एकूण ५ हे. क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्रासाठी तसेच माझ्या एकूण जमीन धारणेपैकी (८-अ नुसार) जास्त क्षेत्रासाठी ठिबक/तुषार सिंचन अनुदानाचा लाभ घेत नाही.
6. संयुक्त ७/१२ मध्ये इतर खातेदारांकडून काही वाद निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी माझी राहील.
7. मी कृषि आयुक्तालय पुणे येथे माझ्या जिल्ह्याकरीता नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म सिंचन उत्पादक कंपनीच्या अधिकृत वितरकाचे कोटेशन मला वितरक/उत्पादक कंपनी प्रतिनिधी यांनी समजावून सांगितले असून त्यामध्ये नमूद सर्व साहित्याचे दर मला मान्य आहेत व सदर साहित्य योग्य दर्जाचे असल्याची खात्री करूनच मी ते स्विकारेल.
8. उत्पादक/वितरक यांचे कडुन संच उभारणी झाले नंतर त्यांचे कडुन मिळणाऱ्या प्रस्तावीत मराठी भाषेतील संच देखभाल मार्गदर्शक पुस्तीका **(Operational & Maintenance Manual)** मला उपलब्ध करुन देण्यात आलेनंतर या मार्गदर्शक पुस्तीकेमध्ये नमुद केलेल्या सुचनांचे मी पालन करेल.
9. अनुदान ठिबक सिंचनाच्या साठी प्राप्त झाले नंतर पुढील ५ वर्षापर्यंत सदर संच सुस्थीतीत व वापरात ठेवण्याची जबाबदारी माझी असुन मी त्यांची अथवा त्यातील कोणत्याही भागाची विक्री करणार नाही.
10. ठिबक संचाच्या उत्पादक कंपनिच्या इंजिनियरने करुन द्यावयाच्या आराखड्यासाठी आवश्यक कागदपत्रे / माहिती, उदा. माती, पाणी परिक्षण अहवाल, विद्युत मोटार डिझेल इंजिन क्षमता, सिंचन सुविधेपासुन ठिबक सिंचन संचाचे अंतर, हेड, घ्यावयाचे पिक, पाणी उपलब्धता इ. सर्व तांत्रिक बाबींची माहीती त्यांना उपलब्ध करुन द्यायची जबाबदारी माझी असुन त्यांनी आराखडा तयार करुन दिलेल्या आराखड्यामध्ये मी बदल करणार नाही.
11. उत्पादक कंपनी किंवा त्यांचे प्रतिनिधी सोबत विहित नमुन्यातील साध्या कागदावर करारनामा मी करुन घेतला असुन तो माझ्याकडे ठेवलेला आहे.
12. अंमलबजावणी यंत्रणेच्या अधिकाऱ्यांना सदरचा संच तपासणी करण्यासाठी माझी मुभा आहे. मी संच तपासणी साठी कोणत्याही प्रकारचा अडथळा अथवा हरकत करणार नाही तपासणीसाठी अडथळा निर्माण केल्यास मी अनुदान मिळण्यास अपात्र राहीन / चुकीचा प्रस्ताव सादर करुन अनुदान काढले असल्यास मिळालेले अनुदान वसुल करण्यास मी पात्र राहील याची मला जाणीव आहे.
13. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत सुक्ष्म सिंचन घटकाचा लाभ मिळणेसाठी मी सादर केलेली सर्व कागदपत्रे खरी आहेत. वरील सर्व माहीती सत्यप्रतिज्ञेवर प्रमाणीत करुन देत आहे. सदर माहीती खोटी आढळुन आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि किंवा संबंधीत कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहील याची मला पुर्ण जाणिव आहे. तरी माझ्या अर्जाचा अनुदानासाठी विचार करावा ही विनंती.
14. मी घोषित करतो / करते की सदर अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहिती व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे.

☐ मी नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य करतो/करते.


पुढे जा






त्यानंतर वरीलप्रमाणे पुढील स्क्रीनवर प्रस्तावित घटकासाठीचे हमीपत्र दिसेल. त्यामधील अटी व शर्ती सहमत असल्यास स्क्रीन वर शेवटी दिलेला चेक बॉक्स निवडा व **"पुढे जा"** या बटणावर क्लिक करा.

## टप्पा-५: स्वयंघोषणा

अंतिम टप्प्यामध्ये शेवटी दिलेल्या स्क्रीन नुसार स्वयंघोषणा दिसेल. प्रकल्पाच्या नमूद केलेल्या अटी व शर्तीशी शेतकरी सहमत असल्यास, प्रत्येक अटी व शर्तीसमोरील चेक बॉक्स निवडा व **"सबमिट करा"** या बटणावर क्लिक करा.





त्यानंतर पुढील स्क्रीनवर अर्ज यशस्वीरित्या सबमिट झाल्याचा संदेश दिसेल. त्यापुढे सदर अर्ज डाऊनलोड अथवा प्रिंट करण्यासाठी बटण दिलेले आहे. त्यावर क्लिक करा व अर्ज जतन करा.





## ४.१.३ माझे अर्ज





वरील प्रमाणे दर्शविल्यानुसार, शेतकरी लाभार्थ्याने सादर केलेल्या अर्जाची स्थिती पाहण्यासाठी डॅशबोर्ड वरील मुख्य मेनू मध्ये **“माझे अर्ज”** या टॅब वर क्लिक करा. यामध्ये अर्जाची सध्यस्थिती व कोणत्या स्तरावर अर्ज आहे याचा तपशील दिसेल. तसेच अर्जाचा तपशील पाहण्यासाठी **“पहा”** या लिंक वर करावे. त्यानंतर खालीलप्रमाणे स्क्रीन दिसेल.





## ४.१.४ अनुदान मागणी





प्रकल्पांतर्गत घटकासाठी शेतकरी लाभार्थ्यास घटक राबविण्यासाठी क्षेत्रीय स्तरावरून पूर्वसंमती मिळेल. त्यानंतर लाभार्थी शेतकऱ्याने प्रत्यक्षात घटकाची अंमलबजावणी केल्यानंतर वरीलप्रमाणे दर्शविल्यानुसार, मुख्य मेनू मध्ये **“अनुदान मागणी”** या टॅब वर क्लिक करावे. अर्जाचा तपशील पाहण्यासाठी **“पहा”** या बटणावर क्लिक करून अर्ज पाहू शकता.





घटकाच्या अंमलबजावणी पश्चात ज्या घटकाकरिता अनुदान मागणी करावयाची आहे त्याच्या पुढील **“अनुदान मागणी”** बटणावर क्लिक करा.





वरीलप्रमाणे घटकाशी **संबंधित कागदपत्रे** (उदा. आराखडा, प्रमाणपत्रे व काम पूर्णत्वाचा दाखला इत्यादी) आवश्यक असल्यास, त्यांची PDF फाईल निवडून अपलोड करा. त्यानंतर देयके आवश्यक असल्यास, **देयकाचा तपशील** नोंद करून त्याची **PDF फाईल अपलोड** करा. यामध्ये देयकाचा क्रमांक, देयक दिनांक व रक्कम अचूकपणे प्रविष्ट करा.




एकापेक्षा अधिक देयके असल्यास वरीलप्रमाणे डाव्या बाजूला शेवटी दिलेल्या **"देयक जोडा"** या बटणावर क्लिक करून देयकांचा तपशील स्वतंत्रपणे प्रविष्ट करावा. त्यानंतर स्क्रीनच्या शेवटी उजव्या बाजुला **"अनुदान मागणी करा "** या टॅब वर क्लिक करा.




अनुदान मागणी पश्चात वेळोवेळी आपल्या अर्जाची स्थिती पाहण्यासाठी **"अनुदान मागणी"** या टॅब वर क्लिक करून प्रक्रिया स्तर पाहू शकता.




| अ. क्र. | विनंती क्रमांक | अर्ज क्र. | देयक विनंती दिनांक. | घटकाचे नाव | गाव | स्तर | सध्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | C५B१९६/३/३०००१८८ | ३०००१८८ | २३-१०-२०२५ | फळबाग लागवड | कुकद्साथ (५४१६५४) | Sanction Desk-4 | प्रक्रिया सुरू आहे |
| २ | ८E४F४२/११/३०००१८५ | ३०००१८५ | २७-१०-२०२५ | ठिबक सिंचन | कुकद्साथ (५४१६५४) | Sanction Desk-4 | प्रक्रिया सुरू आहे |